# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक २६ / २०२३

वीज पुरवठा खंडीत केल्याने कृतीमानकेनसार नुकसान भरपाई मिळण्याबाबत

श्री. तुकाराम रामभाऊ बोडके ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक शहर विभाग २ (महावितरण) ........... ....... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अंबादास सु. पवार, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- माणिकलाल एम. तपासे, कार्यकारी अभियंता, नाशिक शहर २
एच. एच. चौरे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २० एप्रिल २०२३

आदेश पारित दिनांक :- ९ मे २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

नाशिक परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २९ जानेवारी २०२३ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३ मार्च २०२३ रोजी दाखल केले.

२. मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक १७/२२) दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले.

३. अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे दिनांक २५ ऑगष्ट २०१५ पासून महावितरणचे (क्रमांक ०७६२५०००४५७१) मुक्काम वझविरे, तालूका सिन्नर, नाशिक येथील घरगुती ग्राहक आहेत.

- अपिलार्थीस सप्टेंबर २०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधीत ४० युनीट प्रती महिनाप्रमाणे सरासरी वीज देयके दिली. प्रतिवादीने ग्राहकाच्या हितास्तव काही विचार न करता वीज कायदा २००३ चे कलम ५६(१) नुसार कोणतीही पुर्व सुचना न देता मार्च २०२२ मध्ये वीज पुरवठा खंडीत केला. त्यानंतर सुध्दा मे २०२२ ते ऑगष्ट २०२२ या कालावधीत १० युनीट प्रती महिनाप्रमाणे सरासरी वीज देयके दिली.

- सप्टेंबर २०२१ पासून मीटर फॉल्टी अशी नोंद असणारी वीज देयके ग्राहकास महावितरणकडून देण्यात आली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व वितरण परवाना धारकाच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१ (कृतीमानके विनियम २०२१) मधील कलम १५.४.१. नुसार महावितरण प्रत्येक महिन्यात ग्राहकांच्या मीटरमधील नोंदी घेण्यात येतील. परवानाधारक किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीला मीटरमधील नोंदी घेण्यासाठी ग्राहक सर्व सुविधा पुरवील. तथापि सप्टेंबर २०२१ पासून महावितरणने नोंदीच घेतलेल्या दिसत नाहीत.

- कृतीमानके विनियम २०२१ मधील कलम १६.३.६. नुसार परवाना धारक एका वेळेला दोन देयकापेक्षा जास्त अधिकचे अंदाजीत देयके आकारणी असणारी देयके गाहकास देणार नाही याची खात्री करील.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

मात्र अपिलार्थीस एका आर्थिक वर्षात सात अंदाजीत देयके दिलेली आहेत. महावितरणच्या मीटरची स्थिती तपासणे व त्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते, तसे न केल्याने कृतीमानकेनुसार नुकसान भरपाई मिळणे आवश्यक होते.

- अपिलार्थीने कोणत्याही प्रकारचा अनधिकृत वीजेचा वापर केलेला नाही, तसेच ते वीज देयक थकबाकीदारही नाहीत. तरीही कोणतीही नोटीस न देता वीज पुरवठा खंडीत केला. कृतीमानके विनियम २०२१ मधील कलम १५(५) नुसार प्रतिवादींनी मीटरची नियमित तपासणी केली पाहिजे परंतू तपासणी केली नाही. मंचाने महावितरणने तयार केलेल्या सीपीएल च्या आधारे निर्णय दिलेला आहे. वीज पुरवठा खंडीत केल्यावर महावितरणने तशी नोंदही केलेली नाही.

- अपिलार्थीने अभिवेदनात विनानोटीस देता वीज पुरवठा खंडीत केला म्हणून कृतीमानके विनियम २०२१ नुसार नुकसान भरपाई मिळावी व वीज पुरवठा खंडीत असताना अपिलार्थीस देण्यात आलेली वीज देयके रद्द करण्यात यावी, मानसिक व शारीरिक नुकसान पोटी भरपाई मिळावी व योग्य तो न्याय करावा अशी मागणी केली आहे.

४. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या दिनांक ११ एप्रिल २०२३ च्या उत्तरात नमुद केलेले मुख्य मुद्दे व दिनांक २० एप्रिल २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेतः

- अपिलार्थी हे दिनांक २५ ऑगष्ट २०१५ पासून महावितरणचे (क्रमांक ०७६२५०००४५७१) मुक्काम वझविरे, तालूका सिन्नर, नाशिक येथील घरगुती ग्राहक आहेत.

- अपिलार्थीस सप्टेंबर २०२१ पासून एप्रिल २०२२ पर्यंत सरासरी ४० युनीट प्रमाणे वीज देयक देण्यात आलेली होती त्याची प्रथम दुरूस्ती माहे सप्टेंबर २०२१ पासून ते एप्रिल २०२२ या कालावधीमधील आयडी क्रमांक १३२३०३१ अन्वये रू.१३५७/- ची वजावट करून देण्यात आलेली आहे व माहे मे २०२२ पासून ऑक्टोबर २०२२ पर्यंत सरासरी १० युनीट प्रमाणे वीज देयके देण्यात आली होती त्याची

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai. M.E.R.C.

देखील दुरूस्ती मे २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधी मधील आयडी क्रमांक १४१६२९२७ अन्वये रू.४६४/- ची वजावट करण्यात येऊन तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

- माहे मार्च २०२२ पर्यंत वीज देयकाची रू.२४६१/- ची थकबाकी असल्याने त्याचा भरणा करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. अपिलार्थींचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नसून ग्राहकांच्या वायरींगमध्ये तांत्रिक बिघाड असल्या कारणाने खंडीत झाला होता तसे त्यांना जनमित्रांमार्फत सांगण्यात आले आहे.

- अपिलार्थींना सप्टेंबर २०२१ पासून एप्रिल २०२२ पर्यंत सरासरी ४० युनीट व मे २०२२ पासून ऑक्टोबर २०२२ पर्यंत (Computer Average) सरासरी १० युनीट प्रमाणे वीज देयके अदा करण्यात आली होती, अपिलार्थींचे नोव्हेंबर २०२२ मधील फोटो रिडींग हे ३७३ केडब्लुएच असे आहे. सप्टेंबर २०२१ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत फक्त १ युनीटचा वीज वापर झाल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थींस सरासरी देण्यात आलेल्या कालावधीमधील युनीटची वजावट करण्यात येऊन सुधारीत वीज देयक देण्यात यऊन तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे. घर बंद असल्यामुळे मीटर रिडींग घेता आले नाही. त्याबाबत मीटर एजन्सीला पुढील कालावधीत मीटर रिडीग योग्य घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. सुधारीत वीज देयकाचाही ग्राहकाने भरणा केलेला आहे. तात्रिंक दृष्टया निर्माण झालेला सर्व्हिस केबल मधील बिघाड दुरूस्त करून व मीटर बदलून वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला आहे.

- वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थींचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी विंनती प्रतिवादींनी केली आहे.

**<u>विश्लेषण व निर्णय</u>**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे २०१५ पासून महावितरणचे घरगुती ग्राहक आहेत. अपिलार्थींस सप्टेंबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत ४० युनीट प्रती महिना व मे २०२२ ते ऑगष्ट २०२२ या कालावधीत १० युनीट प्रती महिनाप्रमाणे सरासरी वीज देयके दिली. अपिलार्थींने अभिवेदनात प्रतिवादीने विनानोटीस देता २०२२ मार्च मध्ये वीज पुरवठा खंडीत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

केला म्हणून कृतीमानके विनियम २०२१ नुसार नुकसान भरपाई मिळावी व योग्य न्याय मिळावा अशी मागणी सुनावणी दरम्यान केली.

६. अपिलार्थीस सप्टेंबर २०२१ पासून एप्रिल २०२२ पर्यंत सरासरी ४० युनीट प्रमाणे वीज देयक देण्यात आलेली होती त्याची प्रथम दुरूस्ती आयडी क्रमांक १३२३०३१ अन्वये रू.१३५७/- ची वजावट करून देण्यात आलेली आहे व माहे मे २०२२ पासून ऑक्टोबर २०२२ पर्यंत सरासरी १० युनीट प्रमाणे वीज देयके देण्यात आली होती त्याची देखील दुरूस्ती आयडी क्रमांक १४१६२९२७ अन्वये रू.४६४/- ची वजावट करण्यात येऊन तक्रार निकाली काढण्यात आली आहे. माहे मार्च २०२२ पर्यंत वीज देयकाची रू.२४६१/- ची थकबाकी असल्याने त्याचा भरणा करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थींचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नसून ग्राहकांच्या वायरींगमध्ये तांत्रिक बिघाड असल्या कारणाने खंडीत झाला होता. अपिलार्थीचे नोव्हेंबर २०२२ मधील फोटो रिडींग हे ३७३ केडब्लुएच असे होते. सप्टेंबर २०२१ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत फक्त १ युनीटचा वीज वापर झाल्याचे दिसते. अपिलार्थीस सरासरी देण्यात आलेल्या कालावधीमधील युनीटची वजावट करण्यात यऊन सुधारीत वीज देयक देण्यात आले. सुधारीत वीज देयकाचाही ग्राहकाने भरणा केलेला आहे. तात्रिंक दृष्टया निर्माण झालेला सर्व्हिस केबल मधील बिघाड दुरूस्त करून व मीटर बदलून वीज पुरवठा पुर्ववत कल्याचे प्रतिवादीने नमुद केले आहे.

७. सदर ठिकाणी अपिलार्थीचा वापर अत्यंत नगण्य आहे. अपिलार्थीने सरासरी वीज देयकाबाबत कोणतीही तक्रार केल्याचे दिसत नाही तसेच खंडीत वीज पुरवठयाबाबतही तक्रार केल्याचे दिसत नाही. मंचाने त्याच्या आदेशात या सर्व बाबींचा योग्य तो उहापोह केला आहे. मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

८. सबब अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.